९८१

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १४२/प्रनिप्रा/१४१६ दिनांक : 22 JUN 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, **दिनांक १४ जुन, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ५७ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व २) डॉ. बी. एन. हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**<u>विषय क्रमांक १:</u> खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १४/०६/२०२२ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | पदवी वैद्यकीय |
| | | दुपारी ०३:०० वा. | | पदवी दंत |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी वैद्यकीय व दंत या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाची क्रमांक ५७ वी बैठक दिनांक १०/०५/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती, परंतू सदरील बैठकीमध्ये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५, कलम ९(५) मधील तरतुदीनुसार प्रथम वर्ष व्यासायिक पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अहवाल प्राप्त न झाल्याने व संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक संवैशिवसं/शै.व. २०२१-२२/पदवी-पदव्युत्तर पडताळणी/२०२२, दिनांक ०९/०५/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्राधिकरणाची क्रमांक ५७वी बैठक दिनांक १४/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली.

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले, तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) प्रक्रिया शुल्काच्या संदर्भात शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असे संदर्भाधीन पत्राने कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांकडून प्रक्रिया शुल्क प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ६(अ) नुसार वसूल करण्यात यावे.

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यापैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense, ४) MKB व ५) Orphan या संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या अनुषंगाने प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या तपासणी/पडताळणी अहवालांचा गोषवारा खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये | शासकीय महाविद्यालये (प्रपत्र-अ) | | अमान्य प्रवेश (प्रपत्र-ब) | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-क) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १) | पदवी वैद्यकीय | ४८ | २२ | ३६५० | १२ | १७४८ | १४ | १३ | ० | २०१७ |
| २) | पदवी दंत | २९ | ०३ | १८६ | २६ | २३९७ | ० | ० | ० | ० |
| एकुण : | | ७७ | २५ | ३८३६ | ३८ | ४१४५ | १४ | १३ | ० | २०१७ |

D:\Jayant\Minutes\Minutes_ARA_14 June 2022_Med57.docx

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

उक्त तालिकेतील अभ्यासक्रम व महाविद्यालय निहाय तपशीलवार माहिती प्रपत्र - 'अ', 'ब' व 'क' मध्ये सोबत जोडलेली आहे. तालिकेतील दर्शविलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशांबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत,-

१) उक्त तालिकेतील स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेली महाविद्यालये (प्रपत्र-अ) शासकीय महाविद्यालयांच्या संदर्भात शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असे संदर्भाधीन पत्राने कळविले आहे, त्यानुसार संबंधीत शासकीय महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

२) उक्त स्तंभ क्रमांक (६) मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार रितसर प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त न झाल्यामुळे सदरील महाविद्यालयांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत नाही. **(प्रपत्र-ब).**

३) प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांची प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेच्या अहवालास अधीन राहुन तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense, ४) MKB व ५) Orphan या संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थी वगळून उर्वरित प्रवेशांना संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी अधिनियम २०१५ नुसार सादर केलेल्या अहवालास अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरणाची तात्पुरती मान्यता प्रदान करण्यात येत आहे. **(प्रपत्र-क)**

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

**(क) जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री आसराबाई दराडे होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(घ) मधील निर्णयानुसार जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री आसराबाई दराडे होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित ३१ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी उपसमिती गठित करण्यात आली होती. प्रस्तूत प्रकरणी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई येथील क्रमांक डब्ल्यूपीएम-१३२१/प्र.क्र. २४२/२१/शिक्षण-२, दिनांक १३/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात आले.

या संदर्भात संबंधीत संस्थेने सादर केलेल्या सर्व आवश्यक माहिती, न्यायालयीन निर्णय व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. सदरील प्रकरणी संस्थेने सादर केलेले प्रतिज्ञापत्र व मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक (स्टॅम्प) ३७२९/२०२१ मधील न्यायालयीन आदेशाने जगदंबा एज्युकेशन

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सोसायटीचे मातोश्री आसराबाई दराडे होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, नाशिक मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास अंतरिम आदेश पारीत केले. उक्त प्रकरणी न्यायालयाच्या अंतिम आदेशास अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित ३१ विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना (१२वी PCB मध्ये पात्र ठरणाऱ्या) प्राधिकरण मान्यता देत आहे (प्रपत्र-ड). तसेच जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री आसराबाई दराडे होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, नाशिक यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील सदरील प्रवेश प्रकरणी केलेल्या गैरप्रकाराबाबत व अशी चूक भविष्यात पुनश्च होऊ नये, म्हणुन महाविद्यालयास रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील दंडाची रक्कम महाविद्यालयाने हे आदेश पारीत झाल्यापासून १० दिवसांत भरणा करणे बंधनकारक राहील.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार संबंधीतांनी कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : २१/६/२२